

# छोट्या जाहिराती

कमी पैशात जास्त फायदा

अधिक तपशीलाकरिता संपर्क : जाहिरात विभाग : २३१०७३७

### पाहिजेत

● **पुणे चिखली हॉटेलसाठी** इंडियन/तंदूर कुक, किचन सुपरवायझर, कॅप्टन, वेटर, वॉचमन, मोरीवाला पाहिजे. (राहणे + जेवण) ९९२२९०३०३२.

● **मेकॅनिकल कंपनीच्या प्रॉडक्ट** सप्लायसाठी फिल्ड मार्केटिंग मॅनेजर पाहिजेत. संपर्क : मो. ७०२०६८२०३०.

● **टाटा कंपनीत मुलांची** डायरेक्ट पर्मनंट भरती. शिक्षणाची अट नाही. प. १० ते २५ ह. रा. + जे. फ्री. ७८६८७५१३४९.

### विवाहविषयक

● **अभिनव विवाह संस्था** सर्व जाती-धर्मांच्या वधु-वरांसाठी तसेच विधवा, विधुर, घट-स्फोटीत आणि आंतरजातीय वधु-वरांसाठी मोफत नोंदणी. श्री. आबासाहेब कागवाडे मो. ९८८१४३९६१०.

● **स्वप्नपूर्ती अवघ्या महाराष्ट्रातील** ब्राह्मणांसाठी अग्रगण्य विवाह संस्था. दरमहा २०० वधू व २०० वरांची फोन, पत्त्यासहित संपूर्ण माहिती असलेलं मासिक. अत्याधुनिक वेब व यशस्वी मेळाव्यांचे आयोजन. हजारो स्थळे उपलब्ध. फोन : ०२३३-२३२२०७१, मोबा. ९७६७५०१२९१, वेबवर फ्री रजिस्ट्रेशन, १० वर्षांपासून आपुलकीची सेवा. svivah.com

### शेतीविषयक

● **पॉवर टूल्स, ड्रील मशीन,** मार्बल कटिंग मशीन, अँगल ग्रायंडर, ब्लोअर, युरी कटिंग व्हील, मंगलम वेल्डींग रॉड, शेती औषध फवारणी पंप, ताडपत्री होलसेल दरात मिळतील. सर्वत्र डीलर नेमणे आहे. पद्मिनी ट्रेडर्स, सारडा बिल्डिंग, रॉकेल लाईन कॉर्नर, पटेल चौक, सांगली. मो. 9822879638, कोल्हापूर मो. 9822879638

### व्यवसायविषयक

● **पुरुष व महिला बचत** गटातील अध्यक्ष, उपाध्यक्ष व सचिव यांना छोटे कर्ज -माफक व्याजात व्यवसायाची सुवर्णसंधी, गरजूंनी अधिक माहितीसाठी नाव व पत्ता एस.एम.एस. करा. मोबा : ९९६०२२७८४०.

● **घर, नोकरी, व्यवसाय** सांभाळत ३ ते ४ तास काम करून आकर्षक इन्कम मिळवा. जत मो. ८८५६८१८५६२.

### औषधोपचार

● **व्यसनमुक्ती, लैंगिक** समस्या, दारू, तंबाखू, सिगरेट, गुटखा, मावा इ. व्यसनमुक्तीसाठी गोळ्या उपलब्ध. याशिवाय शीघ्रपतन, नपुंसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी यासाठी संपर्क : निर्मल फौंडेशन संचलित निर्मल व्यसनमुक्ती केंद्र, स्टेशन रोड, मिरज ९९२२६४६५६६, ०२३३-२२२५०६०.

● **सेक्स पॉवर कमी होणे** (ताठरता न येणे), नसांची कम जोरी, लहान वाटणे, हस्तमैथुन, लवकर वीर्यपतन यावर गॅरेंटेड इलाज. सांगली-दर मंगळवार/शुक्रवार-हॉटेल प्रभूप्रसादच्या माडीवर, एस. टी. स्टँड-समोर - ११ ते ५ (६९१८१) १२/११/१४

● **दारू व तंबाखू व्यसन-मुक्ती,** वैवाहिक समस्या, लैंगिक विकार यासाठी औषधे व सल्ला मिळेल. पत्ता - आस्था मानसोपचार क्लिनिक (इचलकरंजी) मो.नं. ९९२१२१३५३५.

### पेस्ट कंट्रोल

● **जी. टी. पेस्ट कंट्रोल प्रा. लि.** अॅन आयएसओ ९००१ अॅण्ड १४००१ कंपनी २५ वर्षाचा अनुभव. प्रशिक्षित कर्मचारी वर्ग. झुरळ, वाळवी, ढेकूण, मच्छर, उंदीर, घुशी, माशा, मुंगी, पाली, कोष्टी या सर्व प्रकारचे कीटक नियंत्रण करून मिळेल. इंडस्ट्रीयल एक्स्पोर्टस फेमिगेशन व हिट ट्रिटमेंट करून मिळेल. (०२३३) २२१२६५९, ९८२३०७१८७३ समक्ष भेटावे.

### इतर

● **घरातून किंवा ऑफिस-मधून** काम करा. बॉस नाही, वेळेचे बंधन नाही. पार्ट व फुलटाईम गृहिणी, बिझनेसमॅन, डॉक्टर, नोकरदार, रिटायर्ड व्यक्ती, कोणतेही चेन मार्केटींग नाही किंवा मेंबर बनवा स्किम नाही. एक फोन तुमचे आयुष्य बदलू शकतो. गरजूंना प्राधान्य. मोफत ट्रेनिंग. संपर्क : जोतिराम जाधव. मोबा. ९९७००६४३३३, अनिता मॅडम : ७७५५९१०३३३.

● **शेती, नोकरी, व्यवसाय,** बरोबरच पार्टटाईम/फुलटाईम उत्पन्न वाढवण्यासाठी नॅशनल कंपनीबरोबर काम करण्याची संधी. ८६९८९७७१७१.

### खरेदी-विक्री

● **बदलीमुळे फर्निचर त्वरीत** स्वस्त दरात विकणे. सोफासेट, डबल-सिंगल बेड, कपाट, फ्रीज, टीव्ही, इतर. मोबाईल : ९८६०१२६२६४.

दक्षिण महाराष्ट्र केसरी छोट्या जाहिरातींसाठी संपर्क साधा.

सांगली कार्यालय — श्रेयस कॉम्प्लेक्स, मोडक हॉस्पिटलजवळ, सांगली. दूरध्वनी: ०२३३- २३२०७३८.

कोल्हापूर कार्यालय — ७४९, डी. वॉर्ड, आझाद चौक, जैन गल्ली, रविवार पेठ, कोल्हापूर. (०२३१) २६४४६६४


# अग्रणी नदीचे पुनरुज्जीवन देशासाठी आदर्शवत काम

## जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा यांचे प्रतिपादन

**सांगली : प्रतिनिधी**

अग्रणी नदीचे पुनरूज्जीवन ही निसर्गाचे ऋण फेडण्याची संधी आहे. हे काम सर्वांना आत्मिक समाधान देणारे आहे. हे काम देशासाठी आदर्शवत आहे. ही भविष्यातील अभ्यासकांसाठी केस स्टडी आहे. त्यामुळे या टप्प्यावर नदीचे पुनरुज्जीवन करताना नदीशास्त्राचे पालन करावे. नदीच्या पाण्याकडे केवळ पाणी म्हणून न पाहता, जलनीती आणि नदीशास्त्र समजून घेऊन पुनरूज्जीवनाचे उर्वरित काम पूर्ण करावे. अग्रणी नदीबरोबरच दुष्काळी जत तालुक्याचा पाणी प्रश्न सोडवण्यासाठी महांकाली नदीच्या पुनरूज्जीवनाचा उपक्रमही हाती घ्यावा, असे प्रतिपादन जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा यांनी केले.



सांगली जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित अग्रणी नदी पुनरूज्जीवन आढावा बैठकीत जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा यांनी मार्गदर्शन केले.


जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित अग्रणी नदी पुनरूज्जीवन आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी वि. ना. काळम, कर्नाटकचे प्रशांत होन्नागोळ, अण्णासाहेब अडहळ्ळी, अॅड. संजय होनकांडे, सतीश अडहळ्ळी, रवी नागगूळ, धाराप्पा होन्नागोळ, उपजिल्हाधिकारी किरण कुलकर्णी उपस्थित होते.

जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा म्हणाले, सांगली जिल्ह्यात अग्रणी नदी पुनरूज्जीवनात संघटनात्मक कामे झाल्याबद्दल समाधान व्यक्त करून, जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा म्हणाले, अग्रणी नदी पुनरूज्जीवनामध्ये महाराष्ट्र व कर्नाटक राज्यांमध्ये समन्वयाचे आदर्श उदाहरण निर्माण करू.

जिल्हाधिकारी वि. ना. काळम म्हणाले, जलयुक्त शिवार अभियान आणि अग्रणी नदी पुनरूज्जीवन यांची कार्यपद्धती जलनीतीनुसार अनुसरून अग्रणी नदी प्रवाहित करण्यासाठी समन्वयाचा अभाव भरून काढून अपूर्ण कामे तात्काळ मार्गी लावू.

यावेळी उपजिल्हाधिकारी किरण कुलकर्णी, कृषी उपसंचालक मकरंद कुलकर्णी, सहाय्यक वनसंरक्षक सागर गवते यांच्यासह संपतराव पवार, 'जलबिरादरी'चे प्रतिनिधी, 'जलबिरादरी'चे नरेंद्र चूघ, विनोद बोधनकर, उदय गायकवाड, विलास चौथाई, श्रीपाद करंदीकर, कर्नाटकचे अधिकारी यांनी विचार व्यक्त केले.

यावेळी अप्पर जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.



तालुकास्तरीय क्रिकेट स्पर्धेमध्ये आदर्श पब्लिक संकुलने १४ व १७ वर्षांखालील क्रिकेट सामन्यामध्ये प्रथम क्रमांक मिळवला.

# आदर्श पब्लिक स्कूलचे शालेय क्रिकेट स्पर्धेत प्रथम

**विटा ; प्रतिनिधी**

लोकनेते हणमंतराव पाटील चॅरिटेबल ट्रस्ट संचालित आदर्श पब्लिक स्कूल येथे तालुकास्तरीय शालेय क्रिकेट स्पर्धांचे आयोजन सांगली किडा प्रबोधिनी यांच्यावतीने करण्यात आले होते.

तालुकास्तरीय क्रिकेट स्पर्धेमध्ये आदर्श पब्लिक संकुलने १४ वर्षांखालील व १७ वर्षांखालील क्रिकेट सामन्यामध्ये प्रथम क्रमांक मिळवला. १४ वर्षांखालील मुलांचा अंतिम सामना न्यू इंग्लिश स्कूल, साळशिंगे यांच्यासोबत झाला. या सामन्यामध्ये नाणेफेक कौल न्यू इंग्लिश स्कूल, साळशिंगे यांनी जिंकला व फलंदाजीचा निर्णय घेतला. या फलंदाजीमध्ये ८ षटकामध्ये ३२ धावा केल्या. परंतु आदर्श पब्लिक स्कूल विटा या संघाने ३३ धावा पूर्ण करून विजय मिळवला.

१७ वर्षांखालील मुलांचा अंतिम सामना न्यू इंग्लिश स्कूल, साळशिंगे या संघासोबत झाला. हा सामना आदर्श पब्लिक स्कूल विटाने एकतर्फी जिंकला. या सामन्यामध्ये प्रथम फलंदाजी करून ८ षटकामध्ये ८४ धावा केल्या. आदर्श पब्लिक स्कूलचे मेहुल वरुडे याने ३९ धावा व ३ बळी घेतले आणि आशिष मुळीक याने ४६ नाबाद धावा केल्या. तर हर्ष रोकडे व अथर्व चोथे यांनी अनुक्रमे ३ व २ बळी घेवून आदर्श पब्लिक स्कूलला प्रथम क्रमांक मिळवून दिला. आदर्श पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांना क्रिकेट कोच सागर कोरे यांचे मार्गदर्शन लाभले.

सर्व खेळाडूंचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष डॉ. वैभव (दादा) पाटील, कार्यकारी संचालक पी. टी. पाटील स्कूलचे प्राचार्य महंमदरफिक हलगले, उपप्राचार्य सुभाष टोणपे, बसवराज हुली यांनी केले.

# वस्तू व सेवांच्या खरेदीसाठी गव्हर्मेंट ई-मार्केटप्लस पोर्टल

## - नितीन कोळेकर यांची माहिती

**सांगली : प्रतिनिधी**

केंद्र शासनाने वस्तु व सेवांच्या खरेदीसाठी गव्हर्मेंट ई-मार्केटप्लस (Gem) हे पोर्टल विकसित केले आहे. या पोर्टलमुळे खरेदीसाठी ग्राहकांना जास्तीत जास्त पर्याय उपलब्ध होणार असून खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता येणार आहे, अशी माहिती जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक नितीन कोळेकर यांनी दिली.

कोळेकर म्हणाले, महासंचालक पुरवठा व विल्हेवाट (DGSD) ही दिनांक ३१ ऑक्टोबर २०१७ पासून बंद होणार असून या संघटनेमार्फत होणारी कार्यवाही ही Gem पोर्टलवर परावर्तित होणार आहे. सर्व शासकीय, निमशासकीय, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, स्वायत्त संस्था, अंगीकृत संस्था, शासनाच्या नियंत्रणाखालील असलेल्या सर्व संस्थांना Gem या वेब पोर्टलव्दारे खरेदीची कार्यपध्दती स्वीकृत करून लागू करण्यात आलेली आहे. या सर्व संस्थांना Gem या पोर्टलच्या माध्यमातून दिनांक १ डिसेंबर २०१६ रोजीच्या सुधारीत खरेदी धोरणातील तरतुदींचा अवलंब करून खरेदी करणे बंधनकारक केले आहे.

सध्या या पोर्टलवर २५ हजार ८०० उत्पादक, पुरवठादार नोंदणीकृत झाले असून त्यांच्याकडून १ लाख १३ हजार वस्तू व १७ सेवा या पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

जिल्ह्यातील सर्व औद्योगिक संघटना, औद्योगिक वसाहती व सर्व उद्योजकांनी जास्तीत जास्त उत्पादक व पुरवठदारांना नोंदणीकृत होण्यासाठी योग्य तो प्रचार व प्रसिध्दी करावी, असे आवाहनही श्री. कोळेकर यांनी केले आहे.

## निधन वार्ता

### सरस्वती शिंदे


**वाळवा : वार्ताहर**



नागठाणे (ता. पलुस) येथील सरस्वती गणपती शिंदे (वय ८०) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे. नागेश्वर ट्रस्टचे अध्यक्ष कुमार शिंदे यांच्या त्या मातोश्री होत.

### बाबासाहेब पाटील

**कवठेमहांकाळ : प्रतिनिधी**



येथील सुभेदार बाबासाहेब गणपती पाटील (वय ८८) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. रक्षाविसर्जन आज (दि. ९) सकाळी ९ वाजता कवठेमहांकाळ येथे होणार आहे.

### मुरलीधर पोतदार

**कवठेएकंद : वार्ताहर**



मालगाव (ता. मिरज) येथील मुरलीधर निवृत्ती पोतदार (वय ७३) यांचे निधन झाले. त्यांनी वीज वितरण कंपनीच्या विश्रामबाग कार्यालयात सेवक म्हणून सेवा बजावली. मधुकर पोतदार यांचे कनिष्ठ बंधू होत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, भाऊ, भावजय, पुतणे असा परिवार आहे.

# उमदीत ग्रामस्थांचा निवडणुकीवर बहिष्कार कायम

**जत : प्रतिनिधी**

जत तालुक्यातील उमदी हे गाव सर्व सोयींनी चांगले असतानाही राजकीय इच्छाशक्तीचा अभाव व प्रशासनाने चुकीची भूमिका घेऊन संख येथे अप्पर तहसील कार्यालय केले असून त्याच्या निषेधार्थ उमदी येथील ग्रामस्थांनी ग्रामपंचायत निवडणुकीवर बहिष्कार घालून एकानेही उमेदवारी अर्ज दाखल केला नाही. त्यामुळे प्रशासनाने याची दखल घ्यावी, अशी मागणी या परिसरातून होत आहे.

जत तालुक्याचे विभाजन करून उमदी स्वतंत्र तालुका करावा, अशी मागणी गेल्या २५ वर्षांपासून या परिसरातून होत आहे. १९९५ साली राज्यात शिवसेना व भाजपचे सरकार असताना तत्कालीन मुख्यमंत्री नारायण राणे यांनी हिरवा कंदील दाखवला होता. मात्र राज्यातील युतीचे सरकार जाऊन आघाडीचे सरकार आल्यानंतर या तालुक्याच्या विभाजनाचा प्रश्न तब्बल पंधरा वर्षे मागे पडला. अनेक नेत्यांनी आंदोलने केली. उमदी परिसरातील गावेही बंद ठेवून विभाजनाची मागणी केली. मात्र त्यांना आघाडी सरकारने दाद दिली नाही. त्यानंतर पलूस व कडेगाव असे दोन तालुके झाले. मात्र उमदी तालुक्याचा प्रस्ताव हा लाल फितीत अडकल्याने अजूनही येथील ग्रामस्थांना उमदी तालुक्यासाठी आंदोलन करावे लागते.

**ग्रामपंचायतीवर बहिष्कार**

उमदी स्वतंत्र तालुका अथवा या गावात अप्पर तहसीलदार कार्यालय व्हावे; अन्यथा या गावातील एकही निवडणूक लढवणार नाही. ग्रामपंचायत निवडणुकीवर येथील ग्रामस्थांनी बहिष्कार टाकला असून एकाही पक्षाच्या नेत्यांनी अर्ज भरला नाही. गावातील सर्व नेत्यांनी गावासाठी पहिल्यांदा एकी दाखवली आहे. राष्ट्रवादीचे नेते अॅड. चनाप्पा होर्तीकर, निसार मुल्ला, श्रीमती रेशमाक्का होर्तीकर, भाजपचे संजय तेली, काँग्रेस पक्षाचे निवृत्ती शिंदे, सुनील पोतदार, दावल शेख, राजकुमार चव्हाण, शिवसेनेचे शिवाजीराव पडोळकर, सुरेश माळी आदी नेत्यांनी पहिल्यांदा एकी दाखवली आहे.

**याचिका दाखल**

तालुका पाणी संघर्ष समितीचे अध्यक्ष सुनील पोतदार यांनी शासनाच्या निर्णयाविरोधात मुंबई येथे उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.


दक्षिण महाराष्ट्र केसरी

छोट्या जाहिरातींसाठी संपर्क साधा.

**सांगली शहर कार्यालय**
श्रेयस कॉम्प्लेक्स, आंबेडकर रोड, मोडक हॉस्पिटलजवळ, सांगली. फोन : ०२३३-२३२०७३८.

**मिरज शहर कार्यालय**
मोहन वाटवे, वाटवेज् टाईपरायटींग, तांदूळ मार्केट, महापालिकेसमोर, मिरज. मोबाईल : ९४२१२१९८९३

**तासगाव शहर कार्यालय**
C/O श्री. काशिनाथ कृष्णा माळी, फ्लॉवर मर्चंट, सिध्देश्वर चौक, तासगाव मोबा- ९८९०२०८०७३.

**जत कार्यालय**
मनोहर पवार (कोकळे) टेलिफोन कार्यालयापाठी-मागे, पत्रकारनगर, जत. मोबा. : ९५५२५४१६१४


## भारत यात्रेत सहभागी होण्यासाठी १० किमीचा प्रवास

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

धुळे-फागने गावातील गौतम अहिरे यांनी १० किमीचा प्रवास करून दोन मुले सोनाली आणि रोशन यांच्यासोबत धुळे येथे आलेल्या भारत यात्रेत सहभाग नोंदविला. कैलाश सत्यार्थी यांच्या 'सुरक्षित बालपण-सुरक्षित भारत'साठी आवाज उठविणाऱ्या भारत यात्रेत सहभागी झालेल्या अहिरे कुटुंबियांचे धनंजय टिंगल यांनी स्वागत केले.

# संकेत गोतपागरचे उंचउडीत यश

**रामापूर : वार्ताहर**



संकेत गोतपागर

न्यू इंग्लिश स्कूल रामापूर (ता. कडेगाव) या शाळेने १४ वर्षांखालील गटातील तालुकास्तरीय उंच उडी स्पर्धेत संकेत जीवन गोतपागर या विद्यार्थ्याने कडेगाव येथे आयोजित केलेल्या तालुकास्तरीय स्पर्धेत व्दितीय क्रमांक पटकावला. त्याची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. त्याला क्रीडाशिक्षक संभाजी हणमंत बजंत्री, मुख्याध्यापक बी. एन. कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले.

# १५० रुपयांत ३५० नामवंत दिवाळी अंक योजना

**सांगली : प्रतिनिधी**

सांगली (जिल्हा) नगरवाचनालयाच्यावतीने दरवर्षी दिवाळी अंक योजना राबवली जाते. दिवाळी अंकासाठी वाचक संख्या वाढावी, यासाठी ही योजना राबवली जाते. यावर्षीही १५० रुपयांत ३५० नामवंत दिवाळी अंक वाचायला मिळणार आहेत. यात केसरी, मौज, माहेर, दीपोत्सव, आवाज, जत्रा यासह अनेक नामवंत दिवाळी अंकांनी यावर्षीची साहित्यिक दिवाळी सजणार आहे. अधिक माहितीसाठी २३७७७३८ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन कार्यवाह अतुल गिजरे यांनी केले आहे.

# वाकुर्डे बुद्रुक येथील सरपंचांना पदावरून हटविण्याचा आदेश

## ग्रामसेवकाविरुद्ध प्रशासकीय कारवाई होणार

**शिराळा : प्रतिनिधी**

वाकुर्डे बुद्रुक (ता. शिराळा) येथील भाजपच्या सरपंचांना पदावरून काढून टाकण्याचा; तसेच ग्रामसेवकाविरुद्ध प्रशासकीय कारवाईचे आदेश पुणे विभागीय आयुक्तांनी दिले आहेत.

वाकुर्डे बुद्रुक येथील मागासवर्गीय सामाजिक सभागृह व डोकरा इमारत सरपंच संभाजी पाटील यांनी बेकायदेशीररीत्या पाडल्या होत्या. त्याविरुध्द मागासवर्गीय समाजबांधव व काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ग्रामपंचायत सदस्यांनी; तसेच प्रमुख कार्यकर्त्यांनी तक्रार दाखल केली होती. या तक्रारीनुसार चौकशी होऊन गटविकास अधिकाऱ्यांनी सरपंच दोषी असल्याचा अहवाल जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना सादर केला. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सुनावणी घेऊन विभागीय आयुक्तांना ग्रामपंचायत अधिनियमानुसार सरपंचांचे निलंबन करावे व ग्रामसेवकावर कारवाई करावी, असा अहवाल सादर केला. त्यानुसार विभागीय आयुक्तांनी सुनावणी घेऊन दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले. यावेळी सरपंचांनी ग्रामस्थांच्या अर्जा-नुसार अतिवृष्टीने धोकादायक इमारत पडून जीवितहानी होऊ नये म्हणून मानवतेच्या दृष्टीने इमारती पाडल्या आहेत, असे म्हणणे मांडण्यात आले. यावर तक्रारदारांच्यावतीने अॅड. विलास झोळे- पाटील यांनी आक्षेप घेत सरपंचांचे म्हणणे धुडकावून लावत अतिवृष्टीची नोंद शासकीय दरबारी नाही, केवळ ठेकोदारीतून पैसे कमवायचे या हेतूने इमारती पाडल्या. या इमारती पाडायचा डाव एक वर्षापूर्वीच सरपंच व ग्रामसेवकांनी रचल्याचा जोरदार युक्तिवाद करत ते दोघेही दोषी असून कारवाईस पात्र असल्याचे ग्रामपंचायतीच्याच कागदपत्रावरून अॅड. झोळे-पाटील यांनी विभागीय आयुक्तांच्या निदर्शनास आणले. विभागीय आयुक्तांनी अॅड. झोळे-पाटील यांचा युक्तिवाद ग्राह्य धरून सरपंचांना पदावरून काढून टाकण्याचा व ग्रामसेवकांविरूद्ध प्रशासकीय कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

हा लढा यशस्वी करण्याकरिता भीमराव पाटील, संगीता शेटके, हिंदूराव बसरे, रमेश माने, बंडू पाटील, नामदेव कांबळे, सखाराम कांबळे, सूर्यकांत कांबळे, वसंतराव गायकवाड, दिलीप कांबळे यांनी परिश्रम घेतले.